**वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठीचे प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव पाठवितांना घ्यावयाची दक्षता - सुधारीत तपासणीसूची वित्तीय अधिकार नियमांचे तंतोतंत पालन करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः वैखप्र-२०१७/प्र.क्र. २३२/आ(क्षेप्र)**

तिसरा मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०१७.

**वाचा :-**

१) शासन परिपत्रक जलसंपदा विभाग, क्रमांकः वैखपु-२०११/प्र.क्र.१३६/२०११/आ(क्षेप्र), दिनांक २५ मार्च २०११.
२) शासन परिपत्रक जलसंपदा विभाग, क्रमांकः वैखपु-२०११/प्र.क्र.१३६/२०११/आ(क्षेप्र), दिनांक २९ एप्रिल २०११.
३) शासन पृष्ठांकन जलसंपदा विभाग, क्रमांक: वैखप्र-२०१७/प्र.क्र.१५/२०१७/आ(क्षेप्र), दिनांक ३१/१/२०१७.

**शासन परिपत्रक :-**

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक १६ मार्च २०१६ नुसार शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम, १९६१ मधील तरतूदीच्या अधीन राहून, आकस्मिक उद्भवणा-या २७ आजारांवर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारांवर, शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील, वैद्यकिय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रुपये ३,००,०००/- वरील देय रकमेच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्ती संदर्भातील प्रस्तावांना शासनाच्या मंजूरीची आवश्यकता असते. वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठीचे परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठवितांना कोणती दक्षता घ्यावी याबाबतच्या सूचना संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक २५ मार्च २०११ च्या शासन परिपत्रकाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे विनंती अर्ज स्वीकारतांना घ्यावयाच्या दक्षतेबाबतही सं.क्र.२ येथील दिनांक २९ एप्रिल २०११ च्या परिपत्रकाने कळविले आहे. तसेच एन्जिओप्लास्टी व खाजगी रुग्णालयात बायपास सर्जरीबाबत घेतलेल्या वैद्यकिय उपचाराचे प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे मंजूरीसाठी पाठवितांना वैद्यकिय खर्चाची परिगणना कशी करावी याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांच्या दिनांक १५ फेब्रुवारी २०१६ च्या पत्राने सूचना दिल्या आहेत. तसेच कर्करोग या गंभीर आजारावर शासकीय व शासनमान्य खाजगी रुग्णालय वगळून इतर खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या मंजूरीबाबतचा शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर २०१६ रोजी निर्गमित केला आहे. या शासन पत्र व शासन निर्णयातील सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही व परिगणना करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबतच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सं.क्र.३ येथील पृष्ठांकनाने दिल्या आहेत. असे असूनही क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त होणारी वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबतची देयके परिपूर्णरित्या प्राप्त होत नाहीत. ब-याचदा सर्व कागदपत्रांची पूर्तता केली जात

नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. अशा अपूर्ण प्रस्तावांना शासनाकडून मंजूरी देणे शक्य होत नाही. त्यामुळे अशी देयके मंजूर होण्यास विलंब होतो. हा विलंब टाळण्यासाठी व संबंधित अधिकारी/कर्मचा-यास वेळेत वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची रक्कम प्राप्त व्हावी यासाठी शासनाच्या मंजूरीसाठी आवश्यक असलेले प्रस्ताव सादर करण्याच्या पध्दतीत एकसूत्रीपणा असणे आवश्यक आहे.

वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवितांना पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. नमुना सूचीतील माहिती परिपूर्ण स्वरुपात भरलेली असावी. तसेच रकमा योग्यरित्या नमूद कराव्यात.
२. देयकाचे पृष्ठांकन अचूक असावे.
३. एन्जिओप्लास्टीच्या देयकामध्ये स्टेंटची संख्या व स्टीकर्स नमूद करणे आवश्यक आहे.
४. अवलंबिता प्रमाणपत्र योग्यरित्या भरलेले असावे. तसेच ते साक्षांकित केले पाहिजे.
५. देयकासोबत जोडलेल्या बाहेरुन खरेदी केलेल्या औषधांच्या पावत्यांची यादी सादर करावी. केवळ पावत्या जोडू नयेत.
६. विलंबाने सादर करण्यात येणा-या देयकाचा संयुक्तिक खुलासा.
७. पॅकेज बिल असल्यास तसे प्रस्तावात नमूद करावे.
८. गंभीर आजाराची देयके सादर करतांना देयकांतील प्रमाणपत्रांची PDF स्वरुपातील फाईल पाठवावी.
९. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या पॅनकार्ड, आधारकार्ड, संगणकीकृत वेतनचिठ्ठीची साक्षांकित प्रत पाठवावी.
१०. वैद्यकिय खर्चाच्या प्रतीपूर्तीचे मूळ स्वरुपातील देयकच सादर करावे.
११. सर्व प्रमाणपत्रे साक्षांकित करुनच सादर करावीत.
१२. देयकाची एक झेरॉक्स प्रत कार्यालयात ठेवावी.
१३. प्रस्ताव संदिग्ध स्वरुपात न पाठवता तो तपशीलवार सादर करावा.
१४. अपघाताचे देयक असल्यास तसेच प्रस्तावात सविस्तर नमूद करावे.
१५. अधिकारी/कर्मचारी यांनी देयक सादर केलेलें कार्यालय बंद झाले असल्यास किंवा त्याचे नाव बदलले असल्यास ते प्रस्तावात नमूद करावे. जेणेकरुन अचूक पत्त्यावर देयक पाठवणे शक्य होईल.

२. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या वित्तीय अधिकार मर्यादेमध्ये सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांतील कर्मचा-यांची वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके मंजूर करणे आवश्यक आहे. असे असतांनाही शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ह्या वित्तीय अधिकारांच्या मर्यादेचे उल्लंघन करुन सर्रास वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके मंजूर केली जात आहेत. यास्तव शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दिनांक १६ नोव्हेंबर २०११ व क्रमांक वैखप्र-२०१६/ प्र.क्र.१६/२०१६/ राकावि-२, दिनांक १६ मार्च २०१६ नुसार मंजूर केलेल्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबतचा मागील ५ वर्षांचा वर्षनिहाय अहवाल, त्यामध्ये मंजूर वित्तीय तरतूद व त्यामध्ये मंजूर केलेली अधिकारी/कर्मचारी निहाय रक्कम व आदेशाच्या प्रतीसह सादर करावा.

३. वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे क्षेत्रीय स्तरावरुन उपरोक्त शासन निर्णयांनुसार वित्तीय मर्यादेतच मंजूर करण्याची दक्षता घेणे बंधनकारक आहे. वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे क्षेत्रीय स्तरावरुन मंजूर करतांना वित्तीय मर्यादेचे उल्लंघन झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यास संबंधितांवर

जबाबदारी निश्चित करण्यात येईल व म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ खाली शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

४. वरील सूचनांचे तसेच शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी-२००५/९/ प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च, २००५ व वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२,दिनांक १६ मार्च २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचना व शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे परिपूर्ण प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करण्यासाठी या परिपत्रकासोबत जोडलेल्या तपासणी सूचीप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करावी. अन्यथा क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त झालेले अपूर्ण प्रस्ताव तातडीने संबंधित कार्यालयाकडे परत पाठविण्यात येतील व वैद्यकिय देयकाच्या प्रतिपूर्तीसाठी होणा-या विलंबाची जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर निश्चित करुन त्यांचेवर महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ व शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १४ नोव्हेंबर २०१३ मधील कलम १० नुसार व म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियमांच्या तरतूदी विचारात घेवून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात येईल याची संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०१७१००९१२३८३७१७२७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Govind
Appasaheb
Lokhande

Digitally signed by Govind Appasaheb Lokhande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=f497facd37c9db39517e49b131f934002bb9765b01b8f0ea3dca43732f3ecd29,
serialNumber=ce89373fc7a728d2cdfa1a26c08e1e3f7e3f4f232c1bd146794d3cc3034d5701, cn=Govind Appasaheb Lokhande
Date: 2017.10.09 12:28:50 +05'30'

**( गो.आ.लोखंडे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. सर्व महासंचालक,
२. सर्व महामंडळांचे कार्यकारी संचालक,
३. सर्व मुख्य अभियंते/अधीक्षक अभियंते/कार्यकारी अभियंते
४. आ(क्षेप्र) संग्रहार्थ.